**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ६८/२०१४.</u>**
**<u>लिलाबाई विरूध्द अनील व इतर.</u>**

## <u>निशाणी क्रमांक ४० वर आदेश</u>

**(१)** मुळत: दिवाणी प्रकरण दाखल करून वादी हे वाद मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून त्यांच्या स्वतंत्र हिस्सा पृथक करून त्यांच्या ताब्यात मिळावा अशी विनंती करत आहेत.

**(२)** सदर दिवाणी मुकादम्यामधे वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६ नियम १७ प्रमाणे प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल करून, खालील मजकुर वादपत्रामध्ये समाविष्ट करण्याची परवानगी द्यावी अशी या न्यायालयास विनंती करत आहेत.

> वादी लिलाबाई हिने सर्व्हे नंबर १८०/१ मधील ३० आर इतके क्षेत्र पांडुरंग देवराव शिवशंकर व भगवान रामराव यांना दिनांक १९ मे २०११ रोजीच्या नोंदविणकृत खरेदीखताव्दारे विक्री केलेले आहे तथापि, लेखी कैफीयतीमध्ये अनावधानाने सदरचे क्षेत्र राजु रायेवार यांच्या हक्कामध्ये विक्री केल्याचे नमुद केले आहे. कैफीयतीच्या परिच्छेद क्रमांक ७ व ८ मध्ये देखील तशाच प्रकारचे नमुद केलेले आहे. करीता सदरची दुरूस्ती करून वर नमुद केल्याप्रमाणे मजकुर समाविष्ट करण्याची परवानगी असावी.''

**(३)** प्रतिवादींचे विव्दान विधिज्ञ श्री. दुगाळे यांनी प्रस्तुत अर्जास विस्तृत लेखी म्हणने दाखल केले. त्याचा सारांश खालीलप्रमाणे :-

> **(i)** मुळत: लेखी कैफीयत दाखल करण्यास प्रतिवादींनी उशीर केला होता. त्यानंतर विणा लेखी कैफीयत आदेश रदद् करण्यात आला आणि त्यानंतरच कैफीयत दाखल केलेली आहे.
>
> **(ii)** सदरचा अर्ज म्हणजे केवळ हेतुपुरस्सरपणे दाव्याची कार्यवाही करण्यास उशीर करणे असा आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**(४)** वादीचे विव्दान विधिज्ञ श्री. दुगाळे व प्रतिवादींचे विव्दान विधिज्ञ श्री. टिकोरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**(५)** वादपत्र म्हणजे प्लेन्ट किंवा कैफीयत यामध्ये काही दुरूस्ती करणे जसे की, काही मिळकतीचा समावेश करणे, काही मिळकती वगळण्याची परवानगी मागणे, काही पक्षकारांचा समावेश करणे तर काहीची नावे कमी करण्याची विनंती **<u>आणि</u>** गुणदोषावर न्यायानिर्णय झाल्यानंतर वाद मिळकतीबाबत मागणी केल्याप्रमाणे अनुतोष मिळणे या दोन भिन्न बाबी आहेत.

**(६)** दाव्यामध्ये मागणी केलेली दुरूस्ती करण्यास परवानगी दिली म्हणजे वादीला वाद मिळकतीमध्ये मागणी केल्याप्रमाणे अनुतोष देण्याचे आदेशीत केले आहे ज्याव्दारे प्रतिवादींचे खूप मोठे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे, असे कदीपीही होत नाही. जर मागणी केल्याप्रमाणे कैफीयतीमध्ये दुरूस्ती केल्यास प्रतिवादीस काय अन्याय होणार आहे या बाबीची उकल होत नाही. उलट पक्षी सर्व बाबी न्यायालयासमोर आल्यास गुणदोषावर न्यायोचीत निर्णय होणे कामी त्याची मदतच होणार आहे.

**(७)** दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याकरीता सादर केलेल्या अर्जावर निर्णय नोंदविते वेळी दाव्याच्या गुणदोषाचा विचार करता येणार नाही. निश्चीतच ज्यावेळी चौकशीकरीता प्रकरण लावले जाईल त्यावेळी सर्व कायदेशीर मुद्ये उपस्थित करण्याची संधि प्रतिवादींना राहणार आहे. सर्व बाबींचा विचार करता या न्यायालयास असे दिसुन येत आहे की, मागणी केलेली दुरूस्ती :-

१. मुळ मागणीशी संबधीत आहे,
२. त्याव्दारे कायद्याचा मोठा प्रश्न देखील उपस्थित होत नाही,
३. दुरूस्ती मागणी करण्याकरीता उशीर देखील झालेला नाही,
४. वादपत्रामध्ये दुरूस्तीसाठी वादीने लेखी अर्ज दाखल केलेला आहे,
५. नवे वादकारण घुसडण्याकरीता प्रस्तुतची दुरूस्ती करण्यात येत आहे असे देखील म्हणता येणार नाही,
६. प्रस्तावीत दुरूस्ती ही आदेशीका ६ नियम १६ मध्ये बसत आहे,
७. प्रस्तावित सुधारणेमुळे विरूध्द बाजुस अन्याय होत नाही,
८. दाव्यांतील खरे प्रश्न निकाली काढणे करीता मागणी केलेल्या दुरूस्तीची आवश्यकता आहे. करीता, सदरचा अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे.

**(८)** जर पक्षकाराने न्यायालयापासून काही महत्वाच्या बाबी हेतुपुरस्सरपणे लपवून ठेवल्या असतील तर डिस्क्रीशन वापरून देण्याजोगा असेलेला अनुतोष देता वेळी न्यायालयाने निश्चीत काळजी घेतली पाहीजे तथापि, मागणी केलेली दुरूस्ती टंकलीखानाची अनावधानाने झालेली चुक असल्याबाबत प्रथमदर्शनी दिसत आहे. दाव्यामध्ये वादीने सरतपासणीचे शपथपत्र दाखल केलेले आहे. उलट तपासणी होणे बाकी आहे. करीता आदेश खालीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी क्रमांक ४० मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्ज निशाणी क्रमांक ४० तसेच या आदेशाच्या परिच्छेद क्रमांक २ मध्ये दर्शविलेला मजकुर वादपत्रामध्ये समाविष्ठ करण्याची परवाणगी देण्यात येत आहे.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६ नियम १८ प्रमाणे या आदेशाच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत वादीने सदरची दुरूस्ती

दर्शवुन सुधारणा करावी. चौदा दिवसांचा कालावधी संपल्यानंतर सुधारणा करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

४. वादीने सुधारीत वादपत्राची प्रत संचिकेवर हजर करावी.

( गणेश अं. घुले )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
हदगांव. जिल्हा नांदेड

दिनांक : ४ नोव्हेंबर, २०१६.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

लिपिकाचे नाव - श्री. गोवंदे.
न्यायालयाचे नाव - सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग १, हदगांव.
निकाल दिनांक :०४/११/१६.
पिठासीन अधिका-यानी न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केलेली तारीख :०४/११/१६.
आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख : :०४/११/१६.